**दिनांक ११ ऑगस्ट २०२२ हेरीटेज वौक - ठाणे शहर  अहवाल**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षानिम्मित 'आजादी का अमृत महोत्सव आणि हर घर तिरंगा' अंतर्गत अनेक स्तुत्य उपक्रम विद्या प्रसारक मंडळाच्या के.ग.जोशी कला आणि ना. गो . बेडेकर वाणिज्य स्वायत महाविद्यालय, ठाणे तर्फे आयोजित करण्यात आले असून याच अंतर्गत गुरुवार दिनांक ११ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० पर्यंत 'हेरीटेज वौक - ठाणे शहर' याचे आयोजन करण्यात आले होते. या संदर्भात महाविद्यालयातील इतिहास विभागास ठाणे शहरातील ठिकाणे व त्यांना भेट देण्यासाठीचा  मार्ग ठरविण्याची जबाबदारी देण्यात आली होती. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनां ठाणे शहराचे ऐतिहासिक महत्व  पटवून देण्यासाठी , तसेच इतिहासातील ठाणे शहराचे योगद्दान व ठाणे शहरातील विविध ठिकाणाची इतिहासात असलेली नोंद व त्यांना प्रत्यक्ष भेट देण्यासाठी हया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हया कार्यक्रमात एकूण ४३ विद्यार्थी हे प्रा. डॉ. इंद्रायणी रॉय व प्रा. प्रफुल भोसले यांच्या समवेत सहभागी झाले होते. या उपक्रमात ठाणे शहरातील एकूण सात ऐतिहासिक ठिकाणांची निवड करण्यात आलेली होती. ती  ठिकाणे खालील प्रमाणे

१. दत्त मंदिर - चेंदणी कोळीवाडा  २. माझे ग्रंथ संग्रहालय  - स्टेशन रोड  ३. मामलेदार ऑफिस - स्टेशन रोड    ४. कोपिनेश्वर मंदिर - स्टेशन रोड   ५. तलावपाली - शिवाजी पथ

६. सायनेगॉग - सरकारी दवाखान्या जवळ   ७. पारसी अग्यार - टेंभी नाक्याजवळ

हया उपक्रमामध्ये वरील नमूद केलेल्या सात ठिकाणांना प्रत्यक्षात भेट देण्यात आली व त्यांचे महत्व समजून घेण्यात आले. महाविद्यालयीन विद्यार्थांना हया ठिकाणांबद्दल ऐतिहासिक माहिती देण्यासाठी व त्यांचे महत्व सांगण्यासाठी श्री. अंकुर काणे ह्यांना आमंत्रित करण्यात आले होते. श्री. अंकुर काणे हे आमच्याच महाविद्यालयाचे माझी विद्यार्थी आहेत.  श्री. अंकुर काणे यांनी महाविद्यालयातील शिल्पांची व तसेच वर नमूद केलेल्या केलेल्या ठिकाणांची व तेथे असणाऱ्या शिल्पांची व ऐतिहासिक गोष्टींची पुरेपूर माहिती विद्यार्थ्यांना दिली. हया उपक्रमातून ठाणे शहराचे असणारे ऐतिहासिक महत्वाचे जाणीव महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये करण्यात आली. विद्यार्थ्यां हि हया उपक्रमात पूर्ण उत्साहाने सहभागी झाले. विद्यार्थ्यांना असलेल्या शंकांचे निरासारण हि हया उपक्रमात करण्यात आले.

हया उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयाचे उप प्राचार्या प्रा. सुभाष शिंदे व डॉ. प्रियंवदा टोकेकर यांचेही मार्गदर्शन मिळाले. श्री. नारायण बरसे, ग्रंथपाल व प्रा. डॉ. दीपक साबळे हे हि हया उपक्रमासाठी विद्यर्थ्याना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते.

सह्हायक प्राध्यापक सुभाष शिंदे - कार्यक्रम प्रभारी

प्राध्यापक डॉ.दीपक साबळे - समन्वयक, हर घर तिरंगा मोहीम

ग्रंथपाल श्री.नारायण बारसे - सल्लागार, हर घर तिरंगा मोहीम

सहयोगी प्राध्यापक डॉ. इंद्राणी रॉय - आयोजक

सह्हायक प्राध्यापक प्रफुल भोसले – आयोजक







K. G. Joshi College of Arts and
N.G. Bedekar College Of Commerce (Autonomous), Thane
Accredited 'A' Grade by NAAC in Third Cycle
Best College Award (University of Mumbai)
ISO 9001:2015
Glorious "Fifty Years of Higher Education"
TIRANGA
Heritage Walk
11th August, 2022
पोलीस आयुक्तालय ठाणे शहर
ठाणेनगर पोलीस स्टेशन, ठाणे शहर
आजादी का अमृत महोत्सव
प्रभातफेरी
हर घर तिरंगा


Heritage Walk
11th August, 2022


VPM'S DR. V.N. BEDEKAR INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES, THANE.
ISO 9001:2015
K. G. Joshi College of Arts and
N.G. Bedekar College Of Commerce (Autonomous), Thane
HAR GHAR TIRANGA
Heritage Walk
11th August, 2022
पोलीस आयुक्तालय ठाणे शहर
प्रभातफेरी
आजादी का अमृत महोत्सव
हर घर तिरंगा